# २८. मातंग समुदायाची संघटनात्मक चळवळ

**राहुल नरंगलकर**
सा. प्राध्यापक, राज्यशास्त्र अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर, पुणे.

महाराष्ट्रात अनुसूचित जाती संवर्गात असलेल्या ५९ जातींमध्ये संख्यात्मकदृष्ट्या महार/ नवबौद्ध, मातंग आणि चांभार या प्रमुख अग्रगण्य जाती आहेत. या जाती सवर्ण जातींकडून केल्या जाणाऱ्या शोषणात्याचाराच्या समान बळी असल्यातरी जातवर्णव्यवस्थेच्या विषमताजन्य मुल्य चौकटीच्या वाहक असल्याने त्या परस्पर व्यवहारात सामंजस्य प्रस्थापित करू शकल्या नाहीत. त्यामुळे त्या एकत्रितपणे व्यवस्था परिवर्तनाच्या चळवळीमध्ये सहभागी होताना दिसत नाहीत.स्वातंत्र्यपूर्वकाळात या प्रमुख जातींना एकत्रित करण्यासाठी महात्मा फुले, वि.रा. शिंदे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या परिश्रमपूर्वक प्रयत्नांना व्यापक यश मिळू शकले नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश राजवटीत आणि स्वातंत्र्योत्तर काळात संविधानिक तरतुदीच्या अनुषंगाने उपलब्ध झालेल्या सर्व प्रकारच्या संधीं / सवलतींचा स्वजातीला अधिकाधिक लाभ मिळवून देण्याच्या अभिलासेपोटी या जाती सामुहिक एकजुटीऐवजी प्रस्थापित सवर्ण जातींच्या आधाराने स्वतंत्रपणे प्रवाहित झाल्या. ‘अनुसूचित जाती’ अशी राज्यव्यवस्थेने दिलेली नवी सामुहिक ओळख परिदृढ करण्याऐवजी इथल्या वर्णजात व्यवस्थेने दिलेली मूळ ओळख अधोरेखित करून (पुढे आणून) सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत सक्रीय झाल्या.

**मातंगांचे प्रभाव क्षेत्र**

मातंग जात समुदायाचे वास्तव्य महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात आढळत असलेतरी त्यांच्या लोकसंख्येचे सर्वाधिक केंद्रीकरण मात्र मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातील वऱ्हाडात झालेले दिसुन येते. पुणे आणि मुंबई शहर आणि उपनगरात वास्तव्यास असलेला मातंग समुदाया मुख्यत: मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भातून रोजगाराच्या शोधार्थ स्थलांतरीत झालेला असुन खानदेशातील धुळे-नंदुरबार, कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नगिरी व रायगड आणि विदर्भातील भंडारा, गोंदिया, चंद्रपुर व गडचिरोली या जिल्हयात मात्र हा समुदाय अल्पसंख्य असल्याचे दिसुन येते.[१] काही ठराविक जिल्ह्यांमध्ये ही जात एकवटल्याने त्या जिल्ह्यातच या जातीचा संघटनात्मक वावर अधिक आढळतो.

**मतांगांचे जात संघटन**

कोणत्याही समुदायाला सामाजिक व राजकीय आत्मभान प्राप्त करुन देण्याचे काम त्या समाजाला कार्यक्षेत्र बनवून कार्यरत झालेल्या सामाजिक संघटना करीत असल्याचे सर्वत्र आढळते. मातंग समाजातही अशा अनेक संघटना कार्यरत आहेत.या संघटना जिल्हा आणि उप-प्रदेशनिहाय विखुरलेल्या आणि त्या त्या जिल्ह्यात किंवा उप-प्रदेशात मर्यादित झालेल्या आहेत. ब्रिटिशांच्या सुधाणावादी धोरणामुळे भारतात जातीधारित संघटनांच्या निर्मितीला सुरूवात झाली आणि ती मद्रास प्रांतात पेरियार यांच्या ब्राह्मणेत्तर आणि मुंबई प्रांतात महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीमुळे गतीमान बनली. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्राह्मणेत्तर आणि अस्पृश्य जातीनी जाती परिषदाचे अथवा सभांचे आयोजन करून सामाजिक सुधारणा व शिक्षणाच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले होते. प्रारंभीच्या काळात या जाती परिषदांच्या आयोजनात सत्यशोधक चळवळीतील कार्यकर्ते, त्या त्या जातीतील सधन वर्ग आणि सुशिक्षित उद्योगधंदेवाले यांचा पुढाकार असे.[२] अस्पृश्य जातींच्या जाती परिषदा/सभा महाराष्ट्राच्या विभिन्न भागात आयोजित करण्यात येऊ लागल्या. काही परिषदांमध्ये सर्व अस्पृश्य जाती (महार, मांग, चांभार, ढोर आणि भंगी इत्यादी) सहभागी होत असत, तर काही परिषदा जातनिहाय आयोजित केल्या जात. मातंग आणि चांभार जातींच्या जाती परिषदा/सभा पुणे, मुंबई परिसरात, महार जाती परिषदा मात्र मुंबई, मध्य आणि वऱ्हाड प्रातांत आयोजित केल्या जात होत्या. चांभारांच्या परिषदा संत रोहिदास, महारांच्या संत

चोखामेळा आणि सोमवंशी या पोटजातीच्या नावाने, मातंगांच्या परिषदा 'मातंग समाज' या नावाने आणि कांही परिषदा 'बहिष्कृत जाती' या नावाने ही भरविल्या जात असत.[३] महर्षी विठ्ठल रामजी शिंदेच्या 'निराश्रित साहयकारी मंडळी'[४] आणि श्री. म. मार्टेच्या 'अस्पश्यता निवारण मंडळ' [५] या संस्थांचा जाती सभा किंवा परिषदांच्या आयोजनात पुढाकार असे. या जातीधारित सभा किंवा परिषदांमधूनच जाती संघटना आकाराला आल्या.

मातंग समुदायात महाराष्ट्रव्यापी अशी एकही संघटना प्रभावीपणे कार्यरत असलेली आढळत नाही.बहुतेक संघटना जिल्हा किंवा क्षेत्र केंद्रित झालेल्या दिसतात. जिल्हा किंवा विशिष्ट क्षेत्रव्यापी संघटनात अण्णा भाऊ साठे फाउंडेशन, अखिल भारतीय मातंग संघ, दलित महासंघ, दलित स्वयंसेवक संघ, अण्णा भाऊ साठे संघर्ष समिती, लहुजी सेना, मानवी हक्क अभियान, बहुजन रयत परिषद, दलित विकास आघाडी, मातंग एकता आंदोलन, मातंग युवक संघटना, लहूजी साळवे कर्मचारी कल्याण महासंघ, दलित युवक आंदोलन, लोक स्वराज्य आंदोलन इत्यादीचा समावेश करता येईल. या संघटनां मातंग समुदायात सामाजिक, आर्थिक,सांस्कृतिक शैक्षणिक आणि राजकीय जागृती घडवून आणण्याबरोबर समाजमनाला विशिष्टपणे वळण लावण्याचे काम आपापल्या कुवतीनुसार करीत असलेल्या दिसतात. यातील प्रत्येक संघटना समाजहिताचा उद्घोष करीत असलीतरी प्रत्येक संघटनेचा हेतू आणि कार्यपद्धती भिन्न असल्याने ते आपले कार्य प्रभावीपणे पुढे नेऊ शकले नाहीत. त्या तात्कालिक शोषणात्याचाराच्या प्रश्नांच्या अवतीभौवती घुटमळत असलेल्या दिसतात. त्यातील कोणतीही संघटना निश्चित उद्दिष्ठ ठरवून, त्या अनुषंगाने दीर्घकालीन कार्यक्रमाची आखणी करून त्यासाठी मजबूत सामाजिक पायावर संघटनात्मक संरचना उभे करण्याच्या दिशेने कार्य करताना दिसत नाही. या संघटनांचे अनेक कार्यकर्ते अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या योजनाचा लाभ मिळवून देण्याच्या कार्यात लाभधारक आणि महामंडळ यांच्यात मध्यस्ताची भूमिका वटविण्यात व्यस्त राहण्यात धन्यता मानतात. कांही संघटना सालाबाधाप्रमाणे अण्णा भाऊ साठे आणि लहूजी साळवे यांच्या जयंती आणि स्मृती दिनाच्या कामापुरते मर्यादित झालेल्या आढळतात. कांही संघटनांनी अनिष्ठ रुढी – प्रथांच्या उच्चाटनासाठी निश्चितच महत्वपूर्ण योगदान दिले आहे. परंतु या अनिष्ठ रूढी, प्रथा परंपरांचे मातंग समुदायातून पूर्णत: उच्चाटन होऊ शकले नाही. कांहीजन समाजकार्याच्या नावाखाली संघटना स्थापून किंवा संघटनांमध्ये सहभागी होऊन आपल्या चरित्रार्थाचा प्रश्न मार्गी लावण्याच्या मुख्य उदेशाने संघटनात्मक कार्यात उतरल्याने दलितांची संघटनात्मक चळवळ एन.जी.ओ.करणाच्या दिशेने वाटचाल करताना दिसते.[६] राजकीय पुढाऱ्यांच्या वर्चस्वाखालील संघटना ते ज्या राजकीय पक्षात कार्यरत आहे किंवा ते ज्या राजकीय पक्षाशी सलंग्न आहेत.त्या पक्षाचे राजकीय हितसंबंध लक्षात घेऊनच आपल्या कार्याची कार्यकक्षा रुंधावताना आढळतात. पक्ष अडचणीत येईल असा कोणताही कार्यक्रम तो कितीही समाजहिताचा असलातरी ते हाती घेत नाहीत. ते समजाऐवजी राजकीय पक्षाशी एकनिष्ठ राहताना आढळतात. संघटनेच्या प्रमुखांना राजकीय क्षेत्रातील पद मिळाल्यानंतर विशिष्ट जिल्हा किंवा उप-प्रदेशात मर्यादित असलेली त्यांची संघटना अल्पावधीत महाराष्ट्रव्यापी बनते. पद संपुष्टात आल्यानंतर ती पुन्हा मूळ स्वरुपात मर्यादित होते. अशी विदारक स्थिती राजकीय पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या संघटनांची झालेली आढळते. या संदर्भात मधुकर कांबळे, मच्छिंद्र सकटे, रमेश बागवे, दिलिप कांबळे आणि जयंतराव आवळे या पुढाऱ्यांच्या नेतृत्वाखालील संघटनांचा उल्लेख करता येईल.

### मातंग समुदायाचे नेतृत्व

मातंग समुदायातून जे राजकीय नेतृत्व पुढे आले त्यातील काहींचा इथे उल्लेख करता येईल. बाबुराव भारस्कर, तात्यासाहेब भिंगारदिवे, देवराम कांबळे, के. एल, मोरे इत्यादी नेतृत्व हे यशवंतराव चव्हाणांच्या काळात पुढे आले. नंतरच्या काळात बाबसाहेब गोपले, गोविंदराव बाऱ्हाळीकर, मधुकरराव घाटे, संदीपान थोरात, जयवंत आवळे, मच्छिंद्र सकटे, हरिश मोरे, राम गुंडीले, मधुकर कांबळे, व्हि. जी, रेड्डी, दादासाहेब क्षीरसागर, उत्तमप्रकाश खंदारे, रमेश बागवे, राजू आवळे, अविनाश घाटे, रामचंद्र भरांडे, सचिन बगाडे, रावसाहेब अंतापूरकर,सुधाकर भालेराव इत्यादी. यातील अनेकजन नेतृत्वगुणाचा अभाव असूनही राजकीय पक्षांनी दिलेल्या संधीमुळे तर कांहीजन कुटुंबाच्या वारशाने पुढारी झाले आहेत. काहींनी राजकीय पक्षांना पूरक सामजिक संघटन चालवून राजकीय

पक्षाचे नेतृत्व मिळविले आहे. कांहीजन निव्वळ सामाजिक संघटनेच्या माध्यमातून नेतृत्व करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. यातील अनेकांनी खासदार- आमदार मंत्रीपदेही प्राप्त केली. यातील सर्वाधिक नेतृत्व हे काँग्रेसी व्यवस्थेत राहून कार्यरत झालेले दिसते. काँग्रेसी व्यवस्थेतून बाहेर पडून स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व ते निर्माण करु शकले नाहीत. किंवा मिळालेल्या राजकीय सत्तेचा वापर करून मातंग समुदायाचे जनसंघटन व जनांदोलन उभे करू शकले नाहीत. ते स्वत: प्रस्थापित झाले. काहींनी संस्थात्मक, संघटनात्मक कामही उभारले; मात्र समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी व्यापक कार्य कोणालाही उभारता आले नाही किंवा राजकीय प्रक्रियेत प्रभावी हस्तक्षेप करता आला नाही. समाजाला राजकियदृष्ट्र्या जागृत करण्यासाठी त्यांना व्यापक कार्यक्रम राबविता आले नाहीत. दूरदृष्टीचा अभाव, एकाच पक्षात असलेतरी एकमेकांचे पाय ओढण्याची प्रवृत्ती, पाडापाडीचे राजकारण, मंत्रीपद किंवा अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे अध्यक्षपद मिळविण्यासाठी केले जाणारे कुरघोडीचे राजकारण, वैचारिक प्रगल्भतेचा अभाव, कमकुवत जनाधार आणि परस्परांबदल कमालीची द्वेषभावना इत्यादी दोष अंगी बाळगल्यामुळे ते मागे राहिले आहेत.

क्रांतिवीर लहूजी साळवे मातंग समाज अभ्यास आयोगाने केलेल्या शिफारशीची थंडावलेली अंमलबजावणी, अण्णा भाऊ साठे आणि लहूजी साळवे यांच्या राष्ट्रीय स्मारकाचे रखडलेले काम, आरक्षणाच्या उप वर्गीकरणासाठी राज्यसरकारने घ्यावयाचा पुढाकार आणि अण्णा भाऊ साठे महामंडळाची झालेली आर्थिक दुरावस्था आदि प्रश्नांवर यातील काही संघटना अधून मधून विभिन्न कार्यक्रमाच्या माध्यामतून कार्यरत असलेल्या दिसत असल्यातरी त्या या प्रश्नावर झालेली मातंग समुदायाची कोंडी फोडण्यासाठी आपले आत्मिक बळ एकत्रित येऊन एकवटू शकल्या नाहीत.

**संदर्भ**

१. शिरगणती अहवाल,२०११
२. गेल ओमव्हेट,भाषांतर, पी.डी.दिघे,वासाहतिक समाजातील सांस्कृतिक बंड, सुगावा प्रकाशन, १९९५ पृष्ठ. १५९
३. वसंत मून,मध्यप्रांत-वऱ्हाडातील डॉ.आंबेडकरपूर्व दलित चळवळ, सुगावा प्रकाशन, प्रथमावृत्ती ऑगस्ट १९८७ ,पृष्ठ - ९६-१२४
४. कित्ता - पृष्ठ -९६-१२४
५. कित्ता - पृष्ठ -९६-१२४
६. डॉ.आनंद तेलतुंमडे, दलित चळवळीचे 'एनजीओ'करण, सुगावा प्रकाशन,प्रथमावृत्ती,जून २०१० ,पृष्ठ १३-१६